| | |
|---|---|
| **MHKO030007672022** | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक२९६/२०२२**<br>**निशाणी क्रमांक ३९ खालील आदेश**<br>शंकर श्रीपती व्हरगे<br>वि.<br>नवनाथ संजय गायकवाड |

प्रस्तुतचा अर्ज आरोपीने त्याचेविरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश सेट असाईड होवून मिळणेकरीता दाखल केला आहे.

आरोपीची विनंती खालीलप्रमाणे -

२. प्रस्तुत कामी आरोपीविरुध्द मागील नेमले तारखेस उलटतपास नाहीचा आदेश झाला आहे. आरोपी हे सदर केसमध्ये हजर देखील झालेले आहेत. तथापी आरोपी यांच्या पत्नी डिसेंबर २०२५ मध्ये प्रसुती दरम्यान सिझर झाल्याने तिची प्रकृती खालावली होती त्यामुळे आरोपी यास त्याचे पत्नीस वेळोवेळी दवाखान्यात जावून औषधोपचार करावे लागत होते त्यामुळे आरोपी हा त्यांचे वकीलांशी वेळेमध्ये संपर्क करू शकला नाही अगर केसचे कामकाज पाहू शकला नाही व वेळेत कोर्टात उपस्थीत राहून उलटतपास घेता आला नाही. त्यामुळे उलटतपास नाहीचा आदेश झाला आहे. आरोपीच्या वकिलांना किडनी स्टोनचा त्रास होत होता. त्यामुळे प्रस्तुत कामी आरोपी यांना उलटतपास घेण्यास टाळाटाळ करणेचा हेतू नव्हता. प्रस्तुत कामी आरोपीने फिर्यादीचा उलटतपास न घेतल्यामुळे उलटतपास नाहीचा आदेश पारीत केला आहे. त्यामुळे आरोपीविरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. फिर्यादीने प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे सादर केले. फिर्यादीने असे कथन केले की, प्रस्तुत अर्जातील कथने ही धादांत चुकीची व दिशाभूल करणारी आहेत. यातील आरोपी यांना समन्स लागू झाले परंतु कोर्टात उपस्थित राहणेस टाळाटाळ केलेने त्यांचे विरूध्द वॉरंटचा आदेश होवून त्यांना वॉरंट दि. २०/०३/२०२३ रोजी वॉरंट लागू झाले. तथापि, त्या तारखेपासून दि. १६/०६/२०२६ पर्यंत आरोपी फिर्यादी यांना खोटी तडतोडीची बतावणी/बोलणी करून फसवत आलेले आहेत या कारणााने आरोपीस दया दाखविणेची आवश्यकता नाही. आरोपी हे कोर्टात हजर राहणेस हयगय व टाळाटाळ करीत असलेने आरोपीस सदर काम चालवणेचे नसलेचे स्पष्ट होत आहे. तरी आरोपी याचा अर्ज नामंजूर करणेत यावा. याउपर सदर अर्ज मंजूर करणेबाबत मे.कोर्टाचे मत

बनलेस आरोपीस जबर दंड करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

४. फिर्यादी व आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ यांचा विस्तृत युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता आरोपीविरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारीत झाल्याचे दिसून येते. फिर्यादीने आरोपीच्या प्रस्तुत अर्जावर त्याचे म्हणणे सादर करुन जोरदार हरकत घेतली आहे. आरोपीने दिलेली कारणे विचारात घेता आरोपीचा अर्ज मंजूर करणे न्यायाच्या हिताच्या दृष्टीने गरजेचे असल्याचे दिसून येते. खटल्याचा निकाल गुणवत्तेवर होणेकरीता अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रस्तुत प्रकरण शीघ्र गतीने गुणावगुणांवर निर्णित होण्यास मदत होईल, अनेक अर्जांची उत्पत्ती टाळता येईल आणि आरोपीची बाजू अभिलेखावर येण्यास मदत होईल. परंतु अर्जाकामी आरोपीने केलेल्या खटल्यातील दिरंगाईची बाब विचारात घेता आरोपी याचेवर योग्य ती कॉस्ट आकारुन ती फिर्यादीला देणे उचित होईल. करीता मी खालीलप्रमाणे न्यायोचित आदेश पारीत करीत आहे.

**- आदेश -**

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. आरोपीविरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश आरोपीने रक्कम रुपये ८००/- (अक्षरी रुपये आठशे मात्र) ची कॉस्ट फिर्यादी यांना देण्याच्या अटीवर सेट असाईड करण्यात येत आहे.
३. आरोपीने पुढील तारखेस न चुकता फिर्यादीचा उलटतपास घ्यावा.
४. दोन्ही पक्षांनी नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by NITIN RAMESH BHALGAT
Date: 2026.06.16 16:12:45 +0530

कोल्हापूर.
दिनांक १६/०६/२०२६

(एन.आर.भळगट)
६ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कोल्हापूर.